## प्रेसनोट

## ''सायबर गुन्हयांविषयी जनजागृती अभियान''

जा.क्र. ३७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १८/०१/२०१८

भंडारा:– पोलीस मुख्यालय येथील मिटींग हॉल मध्ये दिनांक १७ जानेवारी २०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीस दलातर्फे Transforming Maharashtra या प्रकल्पांतर्गत ''सायबर गुन्हयांविषयी जनजागृती अभियान'' राबविण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. पोलीस अधीक्षक भंडारा, विनीता साहु होत्या, तर मा. अपर पोलीस अधीक्षक, रश्मि नांदडेकर तसेच प्रमुख वक्ते कमलेश वालदे आय.सी.आय. मॅनेजर भंडारा, मुकेश कवटघरे सायबर एक्सर्ट नागपुर हे होते. कार्यक्रमाची सुरुवात पाहुण्यांना पुष्पगुच्छ देवुन स्वागत करुन झाली. .

यावेळी कार्यक्रमाला मा. पोलीस अधीक्षक विनीता साहु यांनी Transforming maharashtra सायबर सिक्युरिटी, सायबर फ्रॉड गुन्हयाविषयी जनजागृती अभियान निमीत्त सर्व उपस्थिताचे आभार व्यक्त केले. आजचे युग इंटरनेट व स्मार्ट फोनचे आहे. आपले सगळे व्यवहार व संवाद इंटरनेटच्या उपयोगाने व्यापले आहे. अश्या परिस्थितीत सायबर जगात चांगल्या व्यक्तीसोबत वाईट प्रवृत्तीसुध्दा मोठया प्रमाणात सक्रीय आहेत. केवळ आर्थिकच नाही तर भावनिक, सामाजिक व नात्यांची फसवणुक सायबर क्षेत्रात मोठया प्रमाणात वाढली आहे. इंटरनेटच्या मायाजाळयात वावरतांना सायबर क्षेत्रातील वाईट प्रवुत्ती पासुन सावध रहा, हातात स्मार्ट फोन आल्यामुळे सोशल मिडीयाचा वापर अधिक झाला आहे. आर्थिक व्यवहारा बरोबरच दैनंदिन गरजा भागविण्यासाठी मोबाईलचा वापर होत आहे. मात्र हा वापर करतांना आपण बऱ्याच वेळी काळजी घेत नाही. याचाच फायदा सायबर गुन्हेगार घेत असल्याचे सांगीतले. व्हॉटसप, व्टिटर, फेसबुक या सारख्या समाज माध्यमावर आपली वैयक्तिक माहिती छायाचित्र, स्टेटस टाकतांना अत्यंत काळजी घेणे गरजेचे आहे. विशेषत: महिला व मुलींनी या विषयी अधिक काळजी घ्यावी. आमचे पोलीसांचे माध्यमातुन फिरते पोलीस स्टेशन व्द्रारे लोकांना गावा गावात जावुन याबाबत समजावुन सांगत असतात.

समाज माध्यमावर वावरतांना अनोळखी माणसांपासुन सावध राहणे गरजेचे आहे. समाज माध्यमावर अनेक सायबर गुन्हेगार खोटे प्रोफाईल बनवुन धोका देण्याचे काम करीत असतात, त्यामुळे खात्री असल्याशिवाय कुणाचीही फ्रेंड रिक्वेस्ट स्विकारु नका, प्रसार माध्यमांनी याबाबत जाणीव जागृती करावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

सायबर क्षेत्रातील आर्थिक फसवणुकीच्या घटनांमध्ये इतर राज्यातील गुन्हेगार मोठया प्रामाणात असुन अनोळखी कॉलला आपली माहिती शेअर करु नका, इतरांसोबत घडलेला सायबर गुन्हा माज्यासोबत घडणार नाही. ही धारणा न ठेवता सोशल मिडीयाचा गैरवापर टाळा, खात्रीविना कोणतेही

मॅसेज किंवा पोस्ट इतरांना प्रसारित करु नका. आक्षेपार्ह पोस्ट तात्काळ डिलीट करा. अमिषाला बळी पडु नका असे सांगून सतत सजग रहा, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक विनीता साहु यांनी केले.

यावेळी कार्यक्रमाला उपस्थित प्रमुख वक्ते श्री. कमलेश वालदे आय.सी.आय.मॅनेजर भंडारा यांनी सोशल मिडीया उपयुक्त माहिती दिली. कोणत्याही अनोळखी व्यक्ती किंवा कंपनीकडून आलेल्या ई–मेलवर क्लिक करु नका. आपला गोपनीय डाटा शेअर करु नका, पासवर्ड व पीन कुणालाही देवु नका, बॅक डिटेल्स कोणलाही देवु नका, एटीएम व्यवहार काळजीपूर्वक करा. क्रडीट व डेबीट स्वाईप करण्यासाठी कुणाकडेही देवू नका. त्याचप्रमाणे स्वत:ची व बॅकेबाबतची माहिती स्पेशल साईटवर शेअर करु नका, सायबर गुन्हेगार या माहितीचा आधार घेवुन आपल्या खात्यातील रक्कम लंपास करण्याचे काम करीत असतात.तेव्हा काळजीपुर्वक व्यवहार करा, असा सल्ला त्यांनी दिला.

सायबर फॉरेन्सिक आणि सायबर क्राईम याबाबत मुकेश कवटघरे यांनी मार्गदर्शन केले. संगणक हॅकर आपली गोपनीय माहिती हॅक करुन आर्थिक फसवणुक करीत असल्याचे त्यांनी सांगीतले. ऑनलाईन शॉपीग करतांना सुरक्षित संकेतस्थळाचा वापर करावा. सोशल मिडीयावरुन शेअर केलेले मॅसेज केव्हाही रिकव्हर केले जातात.आपण पोस्ट केलेला आक्षेपार्ह मॅसेज नंतर सापडणार नाही या भ्रमात राहू नका. तो केव्हाही रिकव्हर केला जावू शकतो त्यामळे या बाबीपासुन दूर रहा, असा सल्ला त्यांनी दिला. समाज माध्यमातील चुकीच्या प्रवृत्तीला अमिषाला बळी पडून आपले नुकसान करुन घेऊ नका, असे ते म्हणाले.

सायबर गुन्हयांबाबत जनजागृती अभियाना विषयी कार्यशाळेच प्रास्ताविक अपर पोलीस अधिक्षक रश्मि नांदेडकर यांनी सोशल मिडीया तसेच इंटरनेटचा वापर संयमाने व जपुन करावा, असे त्या म्हणाल्या. सायबर गुन्हयांचे प्रमाण वाढत असुन यापासुन लोकांपासुन परप्रवृत्त करण्यासाठी तसेच जागृत करण्यासाठी या कार्यशाळेचे करण्यात आल्याचे त्यांनी सांगीतले.

याप्रसंगी भंडारा जिल्हयाचे पोलीस उपअधिक्षक(गृह) कुलकर्णी, पोलीस निरीक्षक घुसर, स्थानीक गुन्हेशाखा, भंडारा, सपोनि. विनोद रहागंडाले, सायबर सेल, भंडारा, रवि गिते, जिल्हा माहीती अधिकारी भंडारा, पत्रकार बंधु, विद्यार्थी, पालक व शिक्षक उपस्थित होते.

पोनी. (एस.आर. तेलुरे)
जिविशा शाखा
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९२१२५३५४९

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.